# काश्मीरमध्ये नरसंहार





पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक
हिंदुस्थान
अमृत ७५ महोत्सव १९५०-२०२४






■ वर्ष ७५ वे/अंक २४४ वा ■ ■ अमरावती,बुधवार,दिनांक २३ एप्रिल २०२५ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ www.dainikhindusthan.com marathe_vinod1@rediffmail.com ■ भारतीय सौर ९ वैशाख १९४७ ■ ■ पृष्ठे १२ ₹ ४.०० ■


# पहलगामध्ये मोठा दहशतवादी हल्ला; २७ पर्यटकांच्या मृत्युची माहिती



**श्रीनगर दि. २२ : पहलगाम पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात आतापर्यंत २७ जणांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. यापैकी बहुतेक जण हे पर्यटक होते. पर्यटकांना त्यांची नावं आणि धर्म विचारल्यानंत दहशतवाद्यांनी शिवीगाळ केली आणि अंधाधुंद गोळीबार केला. यामध्ये आतापर्यंत २७ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. तर, हा आकडा आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या घटनेने पहलगाममध्ये दहशतीचं वातावरण पसरलं आहे. या घटनेत अनेक पर्यटक जखमीही झाले आहेत, अशी माहिती आहे. तर, दुसरीकडे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा जम्मू-काश्मीरला पोहोचले आहेत.**





जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये मोठा दहशतवादी हल्ला झाला आहे. धक्कादायक म्हणजे भारतीय जवानांवर नाही तर पर्यटकांवर हा हल्ला झाला आहे. या हल्ल्यात २७ जणांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे तर अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेनंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या दिल्लीतील निवासस्थानी उच्चस्तरीय बैठक झाली. यानंतर शाहही जम्मू-काश्मीरला रवाना झाले आहेत.

मंगळवारी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात पर्यटकांच्या एका गटाला लक्ष्य करण्यात आले. हल्ल्यादरम्यान काही घोड्यांनाही गोळ्या लागल्या. सध्या सुरक्षा दलांनी संपूर्ण परिसराला वेढा घातला असून शोधमोहीम तीव्र केली आहे. दहशतवाद्यांचा शोध सुरू आहे.

पहलगाम दहशतवादी हल्लयाबाबत जम्मू-काश्मीर पोलिसांनी सांगितले की, हा हल्ला दुपारी अडीचच्या सुमारास झाला. पहलगाममधील बैसरन मैदानावर २-३ बंदूकधारी सैनिकी गणवेशात आले आणि त्यांनी घोडेस्वारीचा आनंद लुटणाऱ्या पर्यटकांवर अंदाधुंद गोळीबार केला.

बैसरन व्हॅली हे पहलगामपासून काही किलोमीटर अंतरावर असलेले प्रसिद्ध पर्यटन स्थळ आहे. इथे फक्त घोड्याने किंवा पायीच जाता येते. दरवर्षी मोठ्या संख्येने पर्यटक येथे भेट देण्यासाठी येतात. गोळीबाराची घटना अशा वेळी घडली जेव्हा पर्यटक येथे मोठ्या प्रमाणात येतात.

**मोदींचा शाहांना फोन**

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्लयाबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशी फोनवर चर्चा केली आहे. पंतप्रधानांनी शहा यांना योग्य ती कारवाई करण्यास सांगितले आहे. पंतप्रधानांनी शाह यांना घटनास्थळी भेट देण्यास सांगितले आहे. दुसरीकडे शहा यांनी तातडीची बैठक बोलावली आहे. ज्यामध्ये आयबीचे गृह सचिव आणि गृह मंत्रालयाचे इतर अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत जम्मू-काश्मीरचे डीजीपी सामील झाले.

## दोषींना सोडणार नाही, कठोर शिक्षा : मोदी



नवी दिल्ली दि. २२ : जम्मू आणि काश्मीरच्या पहलगाममध्ये आज(२२ एप्रिल २०२५) दहशतवादी हल्ला झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या दहशतवादी हल्ल्यात एका पर्यटकाचा मृत्यू झाला, तर १२ पर्यटक जखमी झाल्याचे वृत्त आहे. या घटनेनंतर लष्कराने परिसराला वेढा घातला असून, शोध मोहीम सुरू केली आहे. या हल्ल्याबाबत पंतप्रधान मोदींनी गृहमंत्री अमित शाहा यांच्याशी फोनवर चर्चा केली आणि त्यांनी कठोर कारवाईचे निर्देश दिले.

पहलगाम येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तीव्र निषेध केला. पंतप्रधान मोदी आपल्या एक्स पोस्टमध्ये म्हणाले, 'जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या *(उर्वरित पान २ वर)*

**कोणी स्विकारली हल्ल्याची जबाबदारी?**

'द रेझिस्टन्स फ्रंट' म्हणजेच टीआरएफने पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. पाकिस्तान समर्थित दहशतवादी संघटनांच्या इशाऱ्यावर काम करणारी ढळ्क्र गेल्या काही वर्षांपासून जम्मू-काश्मीरमध्ये सातत्याने हल्ले करत आहे.



## दहशतवाद्यांच्या गोळीबारात महाराष्ट्रातील दोन पर्यटक मृत्यूमुखी

मुंबई दि. २२ : जम्मू काश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यामध्ये महाराष्ट्रातील दोन पर्यटकांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. दिलीप डिसले आणि अतुल मोने असं या मृत पर्यटकांची नावे आहेत. तर दोन पर्यटक जखमी असून एकजण पनवेलचे असल्याची माहिती आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे जम्मू-काश्मीर प्रशासनातील वरिष्ठांच्या संपर्कात आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काश्मीरचे विभागीय आयुक्त विजयकुमार बिदरी यांना फोन करुन या हल्ल्याची माहिती घेतली. आतापर्यंत प्राप्त माहितीनुसार, महाराष्ट्रातील दिलीप डिसले आणिअतुल मोने या दोघांचा मृत्यू झाला. तर इतर दोघे जमखी आहेत. जखमींमध्ये माणिक पटेल हे पनवेलचे आहेत. तर एस भालचंद्र राव हे राज्यातील कोणत्या भागातील आहेत याची माहिती घेतली जात आहे.


जी काही मदत लागेल *(पान २ वर)*

## माहोल....




पृथ्वीवरचा स्वर्ग असह्य वाटतोय काही लोकांना, म्हणूनच ते नर्क उभा करण्याचा आटापिटा करतात...ह्या अमानुष कृत्याचा तीव्र निषेध!

## हिंदी सक्तीच्या मुद्यावर 'अनिवार्य' शब्द हटवणार : शिक्षणमंत्री भुसे



मुंबई दि. २२ : महाराष्ट्रात इयत्ता पहिलीपासून शाळेतील विद्यार्थ्यांना हिंदी भाषा सक्तीची करण्यात आल्याने वाद पेटला आहे. हिंदी भाषेच्या सक्तीला विरोध करत राज ठाकरेंच्या मनसेनं दंड थोपटले आहेत. तर, राज्य शासनाच्या सुकाणू समितीत असलेल्या शिक्षण तज्ज्ञ रमेश पानसे यांनी देखील हिंदी भाषा पहिलीपासून सक्तीची करणे चुकीचा निर्णय असल्याचे म्हटले. त्यामुळे, सरकारकडून हा निर्णय मागे घेतला जातो की कायम ठेवला जातो हे पाहणे महत्त्वाचे आहे. त्यातच, आज शालेय शिक्षणमंत्री *(उर्वरित पान २ वर)*

### तापमान

| | | |
|---|---|---|
| अमरावती | - | ४४.४ |
| अकोला | - | ४४.८ |
| बुलढाणा | - | ४०.४ |
| ब्रह्मपुरी | - | ४५.२ |
| चंद्रपूर | - | ४५.८ |
| गडचिरोली | - | ४४.० |
| गोंदिया | - | ४२.७ |
| नागपूर | - | ४४.२ |
| वर्धा | - | ४४.२ |
| वाशिम | - | ४३.५ |
| यवतमाळ | - | ४४.० |
| भंडारा | - | ४३.४ |

## युपीएससी परिक्षेत देशात शक्ती दुबे तर महाराष्ट्रात अर्चित डोंगरेने मारली बाजी





नवी दिल्ली दि. २२ : यूपीएससीने २०२४ च्या नागरी सेवा परीक्षेचा अंतिम निकाल जाहीर केला आहे. हा निकाल लेखी परीक्षा आणि मुलाखतीच्या आधारे ठरवण्यात आला आहे. मुलाखती जानेवारी ते एप्रिल २०२५ दरम्यान घेण्यात आल्या. यूपीएससी नागरी सेवा परीक्षा २०२४ मध्ये बसलेले उमेदवार त्यांचा अंतिम निकाल अधिकृत वेबसाइट ाेिि.सींं.ळप वर पाहू शकतात. यूपीएससीने अधिकृत वेबसाइटवर शॉर्टलिस्ट स्वरूपात निकाल जाहीर केला आहे. ज्यामध्ये युपीएसई सीएसई उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची नावे आणि रोल नंबर दिले आहेत.

**१००० हून अधिक उमेदवारांनी यूपीएससी उत्तीर्ण केले**

या परीक्षेत एकूण १००९ उमेदवार *(उर्वरित पान २ वर)*

## पाच आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

मुंबई दि. २२ : राज्य सरकारकडून आयएएस अधिकाऱ्यांची खांदेपालट सुरूच असून आज पुन्हा ५ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये, बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची बढती देण्यात आली असून मत्स्यव्यवसाय विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकपदी नियुक्त करण्यात आलं आहे. तर बीड जिल्हाधिकारीपदी *(उर्वरित पान २ वर)*

## संसद सर्वोच्च, त्यापेक्षा मोठे काही नाही : उपराष्ट्रपती



नवी दिल्ली दि. २२ : उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयावर टीका करताना एक नवा वाद छेडला आहे. सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रपतींना विधेयकांवर निर्णय घेण्यासाठी निर्देश देणे योग्य नसल्याचे मत त्यांनी काही दिवसांपूर्वी व्यक्त केले होते. त्यांच्या आक्रमक भूमिकेवर टीका झाली. या टीकेनंतर त्यांनी आज पुन्हा 'संसद सर्वोच्च आहे', असे विधान करून हा वाद आणखी *(उर्वरित पान २ वर)*

## सोने १ लाखापार

मुंबई दि. २२ : इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशन नुसार, २४ कॅरेट सोन्याच्या १० ग्रॅमच्या किमतीत ३,३३० रुपयांची वाढ होऊन ती १ लाख रुपयांवर पोहोचली आहे. पूर्वी १० ग्रॅम सोन्याची किंमत ₹९६,६७० होती.

त्याच वेळी, आज एक किलो चांदीची किंमत ₹३४२ ने घसरून ₹९५,९०० प्रति किलो *(उर्वरित पान २ वर)*

















